# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.६०३ दिनांक २२/०७/२०२०

१. फिर्यादी पुरुष वय-४४ वर्षे धंदा-कॉन्टॅक्टर,रा.विरार (पुर्व) ता.वसई,जि.पालघरयांनी फिर्याद दिली की, दि.२०/०७/२०२० रोजी रात्रौ १०.३० वाजताचे सुमारास फिर्यादी व त्याचा मित्र हे मधुबन येथे बसले असता त्याचे ओळखीचे आरोपीत क्रमांक १ व २ व सोबत ०२ इसम यांनी काहीएक कारण नसतांना फिर्यादीला शिवीगाळी व दमदाटी करु लागल्याने भांडण सोडवीण्यासाठी आलेला साक्षीदार यांना आरोपीत क्र.१ याने धक्काबुक्की करुन शिवीगाळी केली. तसेच आरोपीत क्र. २ याने फिर्यादीचा उजवा हात फ्रॅक्चर करुन गंभीर दुखापत करण्यास कारणीभुत झाला आहे म्हणुन **वालीव पोलीस ठाणे** रजि.क्र.I ६४४/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३२५, ३२३, ५०४, ५०६ गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

२. फिर्यादी महिला वय ३२ वर्षे रा. खोचिवडे, नायगांव पश्चिम, यांनी फिर्याद दिली की, दि. ०८/०६/२०२० ते दि. १७/०६/२०२० रोजी १०.४५ वाजता आरोपीत यांनी आपसात संगनमत करुन Monster India कंपनिच्या नावाने monsterjobsindia@outlook.in या साईडवर बनावट जाहीरात देवुन फिर्यादीस HDFC बॅकेत Executive Cashiier या जॉबसाठी निवड झाली आहे. असे सांगुन फिर्यादीची विश्वास संपादन करुन google pay वरुन त्याच प्रमाणे युनियन बॅकेचे अकाऊंटच्या सहाय्याने Online Exam Fee, Document Certification, HDFC Bank 45 days training या गोंडस नावाने वेळोवेळी २,००/- रु, ६,५००/- रु व १६,०००/- रु. असे एकुण २४,५००/- रु. फिर्यादीची फसवणुक केली आहे म्हणुन **वसई पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. I २८४/२०२० भा.द.वि.स.कलम- ४२०,५०४,५०६,३४ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

३. फिर्यादी पुरुष वय-२३ वर्षे, रा.वसई पश्चिम, यांनी फिर्याद दिली की, दि. १८/०७/२०२० रोजी पासुन ते दिनांक २१/०७/२०२० रोजीच्या दरम्यान आरोपीत यांनी आपसात संगणमत करुन मा.जिल्हाधिकारी साो. पालघर यांचे कार्यालय याचे htts://covid19.mhpolice.in या संकेत स्थळावरुन ई पासेस हे ऑनलाईन पध्दतीने निशुल्क देण्यात येत असतांना देखील आरोपीत यांनी ई-पाससाठी १५००/-रुपये घेवुन त्यांची फसवणुन केली आहे म्हणुन **तुळींज पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. ६६०/२०२० भा.दं.वि.सं.कलम ४२०, ३४ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

४. फिर्यादी पुरुष वय-७३ वर्षे,व्यवसाय- रिटायर्ड, रा.वसई प. ता.वसई,जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि.२१/०७/२०२० रोजी सकाळी सकाळी ०६.०० वाजता ते ०६.४५ वा.चे दरम्यान फिर्यादी हे त्यांचे मुलीचे राहते घरी गव्हाचे पिठ नसल्याने ते चक्की मधुन घेवुन तिचे राहते घरी देवुन परत माझे राहते घरी पायी चालत जात असतांना, डायमंड मेडिकल ॲण्ड जनरल स्टोरचे समोर, बिकानेर स्विटस्चे बाजुला, १०० फुटी रोड, वसई पश्चिम ता. वसई जि. पालघर येथे गेले असता फिर्यादी यांचे पाठीमागुन आरोपीत हे, मोटारसायकलवर आले. आणि पोलीस असल्याची बतावणी करुन, इधर पैसा और सोना, पिस्टल चोरी हुँआ है, हमे चेक करणेका ऑर्डर मिला है, आपकी तलाशी लेनी है, असे बोलुन बोलण्यात गुंतवुन फिर्यादी यांची ४ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी व १,०००/- रु रोख रक्कम तसेच फिर्यादी हे तक्रार देत असतांना इसम वय-६५ वर्षे हे दिनदयाल नगर भाजी

मार्केट, वसई (प.) येथे असतांना त्यांचीही वरीलप्रमाणे पोलीस असल्याची बतावणी करुन त्यांची ९,८००/- रुपये रोख्र रक्कम ची फसवणुक करुन अशी एकुण २२,८००/- रुपयाची फसवणुक केली म्हणुन **माणिकपुर पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. २४९/२०२० भा.दं.वि.सं.कलम ४२०,१७०, ३४ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

५. फिर्यादी पुरुष वय-७३ वर्षे, व्यवसाय-रिटायर्ड, रा- वसई पश्चिम, ता.वसई, जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि. ०६/०७/२०२० रोजी सायंकाळी ०४.०० वाजता ते दिनांक १९/०७/२०२० रोजी दुपारी १२.०० वा.चे दरम्यान फिर्यादी यांना त्यांचे मोबाईलवर अनोळखी मोबाईल क्रमांक धारक अ९१६२८९५३४००८ आलोप तिवारी याने मै पंजाब नॅशनल बॅक के हेड ऑफिस गाझीयाबाद से बात कर रहा हूॅ, मै हेड ऑफिस बॅक मे क्लर्क हूॅ, अकाऊंट ब्लॉक होने वाला है असे बोलुन फिर्यादी यांचेकडुन अकाऊंट नंबर तसेच एटीएम कार्ड क्रमांक व फिर्यादी यांचे मोबाईलवर आलेला ओटीपी क्रमांक वारंवार घेवुन फिर्यादी यांची एकुण ०६,०१,४८४ /- रुपयाची फसवणुक केली म्हणुन **माणिकपुर पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. २५०/२०२० भा.दं.वि.सं.कलम ४२० प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

६. फिर्यादी पोशि/ज्ञानदिप चंद्रशेखर पाटील, नेम-तुळींज पोलीस ठाणे, यांनी फिर्याद दिली की, दिनांक २१/०७/२०२० रोजी १८:१५ वाजेचे सुमारास आरोपीत याने मा.जिल्हाधिकारी सो. पालघर यांचे मनाई आदेशाचे उल्लंघन करुन तलवारी सारखे हत्यार जवळ बाळगुन सार्वजनीक ठिकाणी मोठ-मोठयाने आरडा-ओरड करुन सार्वजनीक शांततेचा भंग केला म्हणुन **तुळींज पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. ६५९/२०२० भारतीय हत्यारबंदी कायदा कलम ४,२५ आणि म.पो.अधि.१९५१ चे कलम ११२, ११७ ३७ (१)(क), १३५ अन्वये, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.